Impact Factor: 6.017

ISSN: 2278-9529

# GALAXY

## International Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed e-Journal

Vol.15, Issue- 1 January 2026

**15 Years of Open Access**

Editor-In-Chief: Dr. Vishwanath Bite

Managing Editor: Dr. Madhuri Bite

www.galaxyimrj.com

# भारताच्या आर्थिक विकासात सेवा क्षेत्राचे योगदान : एक अध्ययन

**प्रा. राम गणपतराव शेवलीकर**
अर्थशास्त्र विभाग,
लाल बहादुर शास्त्री महाविद्यालय,
धर्माबाद जि. नांदेड.

**गोषवारा (Abstract ) :**

मानवी गरज भागविण्यासाठी ज्याप्रमाणे वस्तूंची आवश्यकता त्याप्रमाणेच सेवा देखील मानवी विकासासाठी आवश्यक असतात. आजच्या युगात आरोग्य , शिक्षण, वाहतूक, दळणवळण, संगणक ( सॉफ्टवेअर व हार्डवेअर ), माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार, इंटरनेट, मनोरंजन, वित्त व विमा, गृहनिर्माण, स्वच्छता अशा अनेक सेवा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनल्या आहेत. जागतिक राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा वाटा 62% एवढा जास्त आहे. भारतासारख्या मध्यम उत्पन्न गटाच्या देशांसाठी सेवा क्षेत्र हे विकासाचे इंजिन बनले आहे. देशातील शेती ,उद्योग, बाजारपेठा अशा क्षेत्राच्या विकासाला सेवा क्षेत्र चालना देत आहे. भारताच्या आर्थिक विकासात मागील दोन दशकापासून सेवा क्षेत्राचे योगदान वाढले आहे. भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पन्नात सेवा क्षेत्राचे योगदान 55 % एवढे असून एकूण रोजगार निर्मिती सेवा क्षेत्राचा वाटा 30% एवढा आहे. देशातील सेवा क्षेत्राचा वृद्धीदर वार्षिक 8% णे वाढत आहे. विदेशी गुंतवणूक आकर्षित करणारे सेवा क्षेत्र हे अग्रगण्य क्षेत्र आहे. जागतिक सेवा निर्यातीत भारताचा वाटा देखील दुपटीने वाढला असून सेवा क्षेत्राच्या दृष्टीने जगात भारताचा सातवा क्रमांक लागतो. जागतिक सेवा निर्यातीत भारताचा वाटा 2005 मध्ये 1.9 % होता, 2014 मध्ये 3 % आणि 2025 मध्ये 4.3 % पर्यंत वाढला आहे. भारतात रोजगारनिर्मिती, उपभोग, निर्यातीत माहिती तंत्रज्ञान व बीपीओ आउटसोर्सिंग, वित्तीय सेवा, वाहतूक व दळवळण, पर्यटन व हॉटेल , दूरसंचार व मनोरंजन या सेवांनी उल्लेखनीय प्रगती केली आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, गुजरात या पाच राज्यांचा एकूण सेवा क्षेत्राच्या जीडीपीमधील वाटा 50% पेक्षा अधिक आहे.

**बीज संज्ञा ( Keywords): सेवा क्षेत्र, स्थूल राष्ट्रीय उत्पन्न, रोजगार, विदेशी व्यापार, पायाभूत सोयी, विदेशी गुंतवणूक, माहिती तंत्रज्ञान, बीपीओ.**

**प्रस्तावना ( Introduction) :**

जागतिक अर्थव्यवस्थांमध्ये सेवा क्षेत्राचे महत्व उल्लेखनीय प्रमाणात वाढले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या आजच्या युगात सेवा क्षेत्राचे योगदान जागतिक जीडीपीच्या दोन तृतीयांश असून जागतिक रोजगार पुरवठ्यात या क्षेत्राचे योगदान वाढले आहे. कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासात शेती आणि

उद्योगाबरोबरच सेवा क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. भारताच्या अर्थव्यवस्थेतही सेवा क्षेत्र सर्वात जास्त योगदान देणारे क्षेत्र बनले आहे. सेवा क्षेत्राच्या दृष्टीने जगात भारताचा सातवा क्रमांक असून मागील दोन दशकांपासून भारताच्या सेवा क्षेत्रातील निर्यात उल्लेखनीय स्वरूपात वाढली आहे. 2013-14 मध्ये भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पन्नात सेवा क्षेत्राचा वाटा 51% एवढा होता त्यात वाढ होऊन 2024-25 मध्ये तो 55 % एवढा झाला होता. सध्या भारतातील सेवा क्षेत्राचा वार्षिक वृद्धी दर 8 % एवढा असून भारतातील एकूण रोजगार निर्मितीत सेवा क्षेत्राचा वाटा 30 टक्के एवढा आहे. भारताच्या एकूण निर्यातीतीही सेवा क्षेत्राचे योगदानही वाढले आहे. सेवा या भारतातील लोकांच्या व्यवहारात अभिन्न घटक आहेत. भारतातील सेवा क्षेत्रात बॅंका, वित्तीय संस्था व विमा, वाहतूक व दळणवळण (दूरसंचार), माहिती तंत्रज्ञान (संगणक, सॉफ्टवेअर व मोबाइल) , हॉटेल व पर्यटन, व्यापार ,मनोरंजन, बांधकाम, स्थावर मालमत्ता, आरोग्य, शिक्षण या सारख्या आर्थिक व सामाजिक सेवांचा समावेश आहे. स्थूल देशांतर्गत उत्पन्न, रोजगार निर्मिती ,विदेशी गुंतवणूक, विदेशी व्यापार या दृष्टीने सेवा क्षेत्र भारताच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. प्रस्तुत् शोध निबंधात भारताच्या अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे योगदान किती महत्वाचे आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**शोध निबंधांची उद्दिष्टे ( Objective of Research) :**

1. भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे स्वरूप समजून घेणे..
2. भारतातील प्रमुख सेवा क्षेत्रांचा आढावा घेणे.
3. भारताच्या आर्थिक विकासात सेवा क्षेत्राचे योगदानाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती ( Research Methodology) :**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधन सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. तथ्य गोळा करण्यासाठी अभ्यास विषयाशी निगडीत असलेल्या संदर्भग्रंथ, विविध अहवाल, आर्थिक सर्वेक्षण, मासिके व इंटरनेट इत्यादींचा आधार घेतला आहे. भारताचे आर्थिक सर्वेक्षण 2024-25 मधून सविस्तर माहितीचे संग्रहण करण्यात आले. प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

**सेवा म्हणजे काय ?**

सेवा या अशा अदृश्य वस्तु असतात की ज्या आपण स्पर्श करू शकत नाही परंतु त्या मानवी जीवनात महत्वाच्या असतात. कोल्टर व आर्मस्ट्रॉंग यांच्यामते " सेवा म्हणजे अशी क्रिया जिचा लाभ एकाद्वारे दुसऱ्याला देताना वस्तूप्रमाणे मालकी निर्माण होत नाही तर गरजांची पूर्तता होते." अर्थव्यवस्थेतील शेती, उद्योग व व्यवसायांना विविध सेवांची आवश्यकता असते जसे की स्थावर मालमत्ता, कुशल मनुष्यबळ , भांडवल, इंधन, तंत्रज्ञान , वाहतूक , विमा ,संगणक सॉफ्टवेअर , हार्डवेअर इंटरनेट इत्यादि सेवा देशाच्या आर्थिक वृद्धी व विकासासाठी आवश्यक असतात व आर्थिक विकासाला चालना देत असतात.

**भारतातील सेवा क्षेत्राचे स्वरूप आणि वर्गीकरण :**

सेवा क्षेत्र हे शेती आणि उदयोग् क्षेत्रांच्या आर्थिक विकासाला सहाय्यभूत ठरतात. आर्थिक सुधारणांपासून भारतातील सेवा क्षेत्राचे स्वरूप व व्याप्तींमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. भारतातील सेवांचे स्वरूप सामान्यतः खालील प्रकारचे आहे.

अ) व्यावसायिक सेवा : या गटात बँका व वित्तसंस्था , विमा अशा सेवांचा समावेश होतो.

आ) पायाभूत सेवा : यात ऊर्जा , वाहतूक , दळणवळण अशा सेवांचा समावेश होतो.

इ) व्यापार सेवा : यात बाजारपेठा , हॉटेल आणि पर्यटन, मनोरंजन , अभियांत्रिकी , संगणक आणि माहिती तंत्रज्ञान इ सेवांचा समावेश होतो.

ई) सामाजिक सेवा : या गटात शिक्षण- प्रशिक्षण , आरोग्य, गृहनिर्माण , पाणीपुरवठा, स्वच्छता इ सेवांचा समावेश होतो.

उ) प्रशासन सेवा : या अंतर्गत प्रशासन सेवा , संरक्षण सेवा , अंतर्गत शांतता व सुरक्षा , न्याय इ सेवांचा समावेश यामध्ये होतो.

**अ ) भारतातील प्रमुख सेवा क्षेत्र ( Major Services in India):**

**1) माहिती तंत्रज्ञान व व्यवसाय प्रक्रिया आउटसोर्सिंग ( IT &BPO) :**

माहिती- तंत्रज्ञान या क्षेत्रात मायक्रोइलेक्ट्रॉनिक्स, संगणक (हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर), आणि ऑप्टो-इलेक्ट्रॉनिक्स - मायक्रोप्रोसेसर, सेमीकंडक्टर, फायबर ऑप्टिक्स यांच्यातील नवोपक्रम यांचा समावेश होतो. चांगल्या आयसीटी सुविधा जगभरात माहितीचे जलद व कार्यक्षम देवाणघेवाण करण्यासाठी मदत करतात. विविध तंत्रज्ञानातील अलिकडच्या प्रगतीमुळे ज्ञानाचे संपादन, उत्पादन, सामायिकरण आणि वापरावर परिणाम होत आहे, ज्यामुळे उत्पादक, सेवा प्रदाते आणि सरकारे यांसह विविध आर्थिक आणि सामाजिक क्रियाकलापांवर परिणाम होत आहे. आयसीटीच्या उपयोगामुळे सेवांमध्ये सुधारणा होत आहेत आणि नवीन रोजगार संधी निर्माण होत आहेत. विशेषतः अधिक कार्यक्षमता आणि नवीन तंत्रज्ञानामध्ये अंतर्निहित नवोपक्रम उत्पादन, व्यापार, प्रशासन, आरोग्यसेवा, शेती आणि सरकारी सेवांच्या वितरणात बदल करत आहेत. माहिती तंत्रज्ञान व दूरसंचार क्षेत्रामुळे स्पर्धात्मकता वाढली असून उत्पादन खर्च, श्रम , वेळ आणि जागेचे अडथळे दूर होत आहेत, वस्तू आणि सेवांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन आणि उत्पादनाच्या काही घटकांना पर्याय उपलब्ध झाले आहेत. व्यवसाय प्रक्रिया आउटसोर्सिंग ( BPO) म्हणजे एखादी कंपनी आपली विशिष्ट कामे जसे की ग्राहक सेवा, डेटा एंट्री किंवा इतर बॅक-ऑफिसची कामे करण्यासाठी बाहेरील (तृतीय-पक्ष) कंपनीची मदत घेते. भारतातील आयसीटी व बीपीओ क्षेत्राने रोजगार, निर्यात व विदेशी व्यापारात उल्लेखनीय प्रगती केली आहे. 2024 मध्ये या उद्योगाने देशातील 54.3 लाख लोकांना रोजगार पुरवठा केला होता. तसेच या उद्योगाने 3.8 % वार्षिक वृद्धीदर गाठला असून 254 अमेरिकन डॉलर्स एवढे उत्पन्न प्राप्त केले आहे.

**2) वित्तीय सेवा ( Financial Services ) :**

वित्तीय सेवांमध्ये बँकिंग व विमा सेवांचा समावेश होतो. आर्थिक व्यवस्थापन, कर्ज सुविधा, गुंतवणूक व व्यवसायाला आर्थिक स्थैर्य देण्यासाठी बँकिंग सेवा तर आर्थिक संरक्षण व जोखीम व्यवस्थापन करण्यासाठी विमा सेवा उपयुक्त ठरतात. गेल्या दशकात भारतातील खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रात वित्तीय सेवांचा सतत विस्तार झाला आहे. प्रधानमंत्री जन धन योजना, प्रधानमंत्री जन धन योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योति विमा योजना, पंतप्रधान विमा योजना, स्टँड अप इंडिया,युपीआय, महिला समृद्धी योजना, किसान क्रेडिट कार्ड अशा शासकीय योजनांमुळे बँकिंग व विमा व्यवसायाला चालना मिळाली आहे.

**3) दूरसंचार ( Telecommunication ) :**

दूरसंचार सेवामध्ये मोबाइल, इंटरनेट , ब्रॉडबॅन्ड इ चा समावेश होतो. भारतात 5 जी तंत्रज्ञानामुळे तसेच मोबाइल व इंटरनेट वापरणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे दूरसंचार क्षेत्रात विस्तार वेगाने होत आहे. भारतात जगातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी दूरसंचार बाजारपेठ निर्माण झाली असून 2024 मध्ये भारतातील दूरसंचार घनत्व 84 % एवढे वाढले होते.

**4) आरोग्य आणि शिक्षण ( Health & Education) :**

देशातील मानवी विकासासाठी वैद्यकीय व शैक्षणिक सेवांचे योगदान महत्वपूर्ण असते. मानवी कौशल्य व कार्यक्षमता या दोन सेवांवर अवलंबून असते. भारतात शिक्षण व आरोग्य सेवांचा विस्तार सार्वजनिक व खाजगी क्षेत्राच्या माध्यमातून होत आहे. कोविड-19 नंतर भारतातील आरोग्य आणि सेवा क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढला असून त्यामुळे शिक्षणातील 2.7 ट्रीलियन वरून 6.5 ट्रीलियन पर्यंत वाढ झाली तर आरोग्य क्षेत्र 1.1 ट्रीलियन वरून 2.5 ट्रीलियन पर्यंत वाढले. शासनाने अनेक आरोग्य सुविधा लोकांना उपलब्ध करून दिल्या जात आहेत. राष्ट्रीय आरोग्य अभियान, आयुष्यमान भारत अशा योजनांच्या माध्यमातून आरोग्य सुविधा सर्वांना देण्यात येत आहेत. तरीही आरोग्य कर्मचाऱ्यांची कमतरता, आरोग्य सुविधामधील प्रादेशिक असमतोल अशा अडचणी आहेत. शिक्षणात गुणवत्ता वाढीसाठी नवीन शैक्षणिक धोरण स्वीकारले असले तरीही शिक्षण क्षेत्रात कमी नोंदणी प्रमाण, गळतीचे अधिक प्रमाण, महागडे खाजगी शिक्षण, कौशल्यक्षमतेचा अभाव अशी अनेक आव्हाने आहेत.

**5) हॉटेल, पर्यटन आणि मनोरंजन ( Hotel , Tourism & Entertainment ) :**

2023 मध्ये पर्यटन क्षेत्राचे जीडीपीतील योगदान 5 % एवढे असून याच वर्षी पर्यटन क्षेत्राने 7.6 कोटी नोकऱ्या निर्माण केल्या होत्या. याच कालावधीत जागतिक आयटीएमध्ये भारताचा वाटा 1.45 टक्के होता. पर्यटनाद्वारे भारताला 28 अब्ज अमेरिकन डॉलर्स एवढे परकीय चलन प्राप्त झाले. भारताला जागतिक पर्यटन उत्पन्नाच्या 1.8 टक्के एवढे उत्पन्न मिळाले. भारत जागतिक पर्यटन उत्पन्नात जगात 14 व्या क्रमांकावर पोहोचला आहे. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पर्यटनामुळे भारतात हॉटेल आणि रेस्टॉरंट मध्ये मोठी वाढ होत आहे. तसेच भारतातील मनोरंजन उद्योगही वेगाने वाढणारा असून चित्रपट, दूरदर्शन, डिजिटल मीडिया (ओटीटी), संगीत , जाहिराती इत्यादिमध्ये रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहेत.

**6) वाहतूक व दळणवळण ( Transport & Communication) :**

वाहतूक आणि दळणवळण सेवा शरीरातील धमण्याप्रमाणे महत्वपूर्ण असतात. रस्ते, रेल्वे , विमान व जलवाहतूक देशाच्या विकासात मोलाच्या असतात. तसेच टपाल व कुरियर सेवा देखील महत्वाच्या आहेत. भारतीय रेल्वे ही जगातील चौथी मोठी सेवा असून मागील वर्षाच्या तुलनेत 2024 मध्ये प्रवासी वाहतुकीत 8% आणि माल वाहतुकीत 5.2% एवढी वाढ झाली.

**7) स्थावर मालमत्ता आणि बांधकाम ( Real Estate & Construction)**

स्थावर मालमत्ता आणि बांधकाम हा देखील भारतातील वेगाने वाढणारा सेवा उद्योग आहे. रस्ते व पूल निर्मिती, गृहनिर्माण शहरी आणि ग्रामीण मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. प्रधानमंत्री आवास योजना, स्मार्ट शहरे इत्यादीमुळे बांधकाम क्षेत्रात रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत. त्यामुळे लोह-पोलाद , सीमेंट, फर्निचर, वीट उद्योग अशा उद्योगांची मागणी मोठया प्रमाणात वाढली आहे.

**ब) भारतातील सेवा क्षेत्राचा राज्यनिहाय वाटा** ( State wise share in services) :

भारतात सेवा क्षेत्राचे योगदान महत्वपूर्ण असले तरी सेवा क्षेत्राच्या बाबतीत प्रादेशिक असंतुलन आढळून येते. एकूण सेवा क्षेत्राच्या जीडीपीमध्ये महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यांचा वाटा एक चतुर्थांशपेक्षा आधिक आहे. तर महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, उत्तर

प्रदेश, गुजरात या पाच राज्यांचा एकूण सेवा क्षेत्राच्या जीडीपीमधील वाटा 50% पेक्षा अधिक आहे. देशातील इतर राज्यांचा सेवा क्षेत्रातील वाटा पन्नास टक्के पेक्षा कमी आहे.

तक्ता क्र. 1 : भारतातील सेवा क्षेत्राचा राज्यनिहाय वाटा (%) 2023 च्या स्थिर किंमत पातळीवर आधारित

| राज्य | सेवा क्षेत्राचा राज्यनिहाय वाटा ( %) | राज्य | सेवा क्षेत्राचा राज्यनिहाय वाटा (%) |
|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | 3.9 | मणीपुर | 0.2 |
| अरुणाचल प्रदेश | 0.1 | मेघालय | 0.2 |
| आसाम | 1.3 | मिजोराम | 0.1 |
| बिहार | 3.5 | नागालँड | 0.2 |
| छत्तीसढ | 1.3 | ओडिसा | 2.1 |
| गोवा | 0.3 | पंजाब | 3.0 |
| गुजरात | 6.2 | राजस्थान | 4.6 |
| हरयाणा | 3.7 | सिक्कीम | 0.1 |
| हिमाचल प्रदेश | 0.7 | तामिळनाडू | 9.4 |
| झारखंड | 1.5 | तेलंगाणा | 5.8 |
| कर्नाटक | 10.9 | त्रिपुरा | 0.3 |
| केरळ | 4.7 | उत्तर प्रदेश | 8.7 |
| मध्य प्रदेश | 3.3 | उत्तराखंड | 1.1 |
| महाराष्ट्र | 16.9 | पश्चिम बंगाल | 6.0 |

Source: Directorate of Economics and Statistics of respective State Governments hosted by MoSPI

**ब ) भारताच्या अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे योगदान :**

**1) राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा ( Contribution in GDP) :**

देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात सतत होणारी वाढ हे आर्थिक वृद्धीचे लक्षण असते. तसेच कोणत्याही देशाचे स्थूल राष्ट्रीय उत्पादन शेती , उद्योग व सेवा क्षेत्रातील उत्पादनावर अवलंबून असते. भारताच्या आर्थिक विकासात शेती, उद्योग व सेवा क्षेत्र या तिन्ही क्षेत्राचे योगदान महत्वपूर्ण असले तरी त्यात सेवा क्षेत्राचे योगदान उल्लेखनीयरित्या वाढले आहे. भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनात सेवा क्षेत्राचा वाटा 1950-51 मध्ये 30.5 % एवढा होता तो सध्या 55 % पेक्षा जास्त वाढलेला आहे. ( जागतिक सरासरीच्या 62 % अजूनही कमी आहे ) 1950 ते 1980 या चार दशकात भारतातील सेवाक्षेत्राच्या वाट्यात 13 टक्क्याने वाढ झाली आहे. भारताने स्वीकारलेल्या आर्थिक सुधारणांमुळे 1990 नंतर सेवा क्षेत्राच्या योगदानात उल्लेखनीय वाढ झालेली असून सध्या भारताच्या जीडीपी मधील सेवा क्षेत्राचे योगदान मंद गतीने वाढत आहे. भारतातील संगणक व माहिती तंत्रज्ञान, मनोरंजन व दूरसंचार, व्यापार, हॉटेल व रेस्टॉरंट, वाहतूक, साठवणूक , वित्त व विमा, स्थावर मालमत्ता, बांधकाम, पर्यटन यासोबतच संरक्षण, आरोग्य ,शिक्षण, पाणी पुरवठा, ऊर्जा इत्यादि सामाजिक सेवांमध्येही वेगाने वाढ झाली आहे. भारताच्या जीडीपीमध्ये माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा वाटा आणि जागतिक आउटसोर्सिंग बाजारपेठेमध्ये 52 % आहे. माहिती आणि संगणक-संबंधित सेवा गेल्या दशकात (2013-23 ) 12.8 टक्के दराने वाढल्या. एकूण जीव्हीएमधील त्यांचा वाटा 6.3 टक्क्यांवरून 10.9 टक्क्यांपर्यंत वाढला.

तक्ता क्र. 2 : स्थूल देशांतर्गत उत्पादनाचा क्षेत्रीय वाटा (%)

| वर्ष | शेती | उद्योग | सेवा | एकूण |
|---|---|---|---|---|
| 2011-12 ते 2013-14 | 21.1 | 28.8 | 50.1 | 100 |
| 2014-15 ते 2016-17 | 18.7 | 28.4 | 52.9 | 100 |
| 2017-18 ते 2019-20 | 17.6 | 28.2 | 54.2 | 100 |
| 2020-21 ते 2022-23 | 18.1 | 28.6 | 53.3 | 100 |
| 2023-24 | 16.7 | 28.8 | 54.5 | 100 |

स्रोत : NITI Aayog. (2025). India’s Services Sector: Insights from GVA trends and State-level dynamics. October 2025.

**1) सेवा क्षेत्रातील वृद्धी दर ( Growth rate) :**

भारताच्या आर्थिक विकासाला चालना देण्याचे काम सेवा क्षेत्राने केल्याचे दिसून येते. भारताच्या आर्थिक वृद्धीचा दर सध्या 6.5 % असून त्यात सेवा क्षेत्राचे स्थान अव्वल आहे. भारतातील सेवा क्षेत्रातील वृद्धी दर 1990 च्या दशकात 7.5 % होता. कोरोना साथीपूर्वी 2013-20

या आर्थिक वर्षांमध्ये सेवा क्षेत्राचा सरासरी विकास दर 8 टक्के होता. कोरोना कालखंडात देशातील वाहतूक दळवळण, बँका, पर्यटन, बाजारपेठा , स्थावर मालमत्ता, हॉटेल व रेस्टॉरंट, मनोरंजन अशा सर्वच सेवा ठप्प पडल्या होत्या. त्यामुळे याकाळात सेवा क्षेत्राचा वाढीचा दर नकारात्मक होता. त्यावेळी आरोग्य , इंटरनेट सेवा यांच्यात वाढ झालेली होती. त्यामुळे कोविड-19 मध्ये सेवा क्षेत्राचा वृद्धीदर -8.4 एवढा घटला होता नंतरच्या कालावधीत सेवा क्षेत्राच्या वृद्धीदर वेगाने वाढल्याचे दिसून आले. 2023-2025 या कालावधीत हा वृद्धीदर 8.3 टक्के झाला आहे. युरोपियन देशांमध्ये मंदिसदृश्य परिस्थिती असली तरीही भारतीय अर्थव्यवस्था भक्कम अवस्थेत असण्याचे एक कारण भारतातील वाढते सेवा क्षेत्र हे आहे असे म्हणता येते.

तक्ता क्र. 3 : भारतातील सेवा क्षेत्रातील वृद्धी दर

| वर्ष | सेवा क्षेत्रातील वृद्धी दर (%) | वर्ष | सेवा क्षेत्रातील वृद्धी दर (%) |
|---|---|---|---|
| 2013 | 8.3 | 2019 | 7.2 |
| 2014 | 7.7 | 2020 | 6.4 |
| 2015 | 9.8 | 2021 | -8.4 |
| 2016 | 9.4 | 2022 | 9.2 |
| 2017 | 8.5 | 2023 | 10.0 |
| 2018 | 6.3 | 2024 | 7.6 |
| | | 2025 | 7.2 |

Source: Ministry of Statistics and Programme Implementation https://www.mospi.gov.in/publication/national-accounts-statistics-2024

**2) रोजगारातील वाटा ( Contribution in Employment) :**

भारतासारख्या लोकसंख्या जास्त असणाऱ्या देशात रोजगार निर्मितीला अत्यंत महत्व आहे. भारतात बेरोजगारी हे मोठे आव्हान असून सेवा क्षेत्राच्या विकासामुळे या समस्येची तीव्रता कमी होण्यास मदत झाली आहे. भारतात रोजगार निर्मितीत सेवा क्षेत्राचा वाटा 30 % आहे, कृषि क्षेत्राचा 46 % आणि उद्योग क्षेत्रात 24 % रोजगार मिळत आहे. भारतात सेवा क्षेत्राचा एकूण रोजगारातील वाटा 1972-73 मध्ये 14.6 %, 1993-94 मध्ये 21.2 % तर 2006-07 मध्ये 29.4 % होता. 2020-21 मध्ये केवळ माहिती तंत्रज्ञान व बीपीओ ने सुमारे 4.47 दशलक्ष लोकांना प्रत्यक्ष आणि 1.2 कोटी लोकांना अप्रत्यक्ष

रोजगार दिला आहे. याचा अर्थ सेवा क्षेत्रातून रोजगारात वाढ होत आहे. भारत हा तरुणांचा देश असून सेवा क्षेत्राद्वारे कुशल तरुणांना संगणक व माहिती तंत्रज्ञान, व्यापार, बँका व विमा कंपन्या, मनोरंजन व दूरसंचार, बांधकाम अशा सेवा क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होत आहे. देशात जागतिकीकरणानंतर भारतातील वाहतूक व दळणवळण, बँका व वित्तीय सेवा, माहिती तंत्रज्ञान इत्यादि सेवांचा विस्तार झाल्याने रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत.. शेती क्षेत्राच्या तुलनेत भारतात सेवा क्षेत्रातून मिळणाऱ्या रोजगाराच्या संधी अत्यंत कमी असून त्यामध्ये आणखी वाढ होणे आवश्यक आहे.

**3) सेवा क्षेत्रातील विदेशी गुंतवणुक ( Foreign Investment) :**

भांडवल हा आर्थिक विकासाचा महत्वाचा घटक आहे. भांडवल टंचाई हे कोणत्याही देशाच्या विकासातील अडथळा असतो. एखाद्या राष्ट्रातील भांडवली गुंतवणुकीसाठी आंतरराष्ट्रीय संस्था किंवा इतर राष्ट्राकडून आणलेली भांडवली साधनसामग्री म्हणजे विदेशी भांडवल होय. कोणत्याही देशाच्या जलद आर्थिक विकासासाठी देशांतर्गत बचत जशी महत्वाची असते तशीच विदेशी भांडवलप्रवाह देखील महत्वाचा असतो. भांडवलाच्या उपलब्धतेमुळे देशातील साधनसंपत्तीचा कार्यक्षम उपयोग होतो, पायाभूत सुविधांची निर्मिती होते, तांत्रिक प्रगती होते, उत्पादनात नवप्रवर्तन घडून आणले जाते, कामगारांची कौशल्यवृद्धी होते, बाजारपेठांचा विस्तार होत असतो. भारताच्या सेवा क्षेत्रात वाढत असलेल्या गुंतवणूकीमुळे आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे. विदेशी गुंतवणुकीचा प्रवाह देशात आणण्याच्या दृष्टीने भारतात सेवा क्षेत्राचे योगदान सर्वाधिक आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील सॉफ्टवेअर , हार्डवेअर , दूरसंचार आणि बांधकाम उद्योगात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक दिसून येते. भारतातील वित्तीय सेवा(21 %), संगणक व सॉफ्टवेअर(8%) , दूरसंचार(8 % ) , गृहनिर्माण व स्थावर मालमत्ता(7 %),बांधकाम(7 %) या सेवांत एकूण 44 % गुंतवणूक झाली आहे. भारत हा जगातील पाचव्या क्रमांकाचा सर्वात मोठा थेट परकीय गुंतवणूक प्राप्तकर्ता आहे. 2021-22 मध्ये भारताची एकूण थेट परदेशी गुंतवणूक 83.57 अमेरिकन डॉलर्स होती, त्यात सेवा क्षेत्रातील थेट परदेशी गुंतवणूक 16.73 अमेरिकन डॉलर्स होती, जी एकूण थेट परदेशी गुंतवणुकीच्या 54 % एवढी होती.

**4) विदेशी व्यापारातील योगदान ( Contribution in Foreign Trade) :**

विदेशी व्यापाराला आर्थिक विकासाचे इंजिन समजले जाते. विदेशी व्यापारामुळे बाजारपेठांचा विस्तार होतो आणि गुंतवणूक वाढीला चालना मिळते. तसेच साधनसंपत्तीचे कार्यक्षम वाटप होत असल्याने उत्पन्न व बचतीमध्ये वाढ होते. विदेशी व्यापारामुळे श्रम विभागणी व विशेषीकरणाचे लाभ मिळतात. देशातील शेती व उद्योग क्षेत्रात उत्पादन व रोजगार वाढण्यास मदत होते, तसेच बहुमूल्य विदेशी चलनाची प्राप्ती होत असते. भारताच्या एकूण निर्यातीत सेवा क्षेत्राचे योगदान महत्वपूर्ण आहे. सध्या जागतिक सेवा निर्यातीत जगात अमेरिका (13 %) , ब्रिटन ( 7.4 %) , जर्मनी( 5.5 %) , आयर्लंड, चीन आणि फ्रांसनंतर भारताचा सातवा क्रमांक आहे. जागतिक सेवा निर्यातीत भारताचा वाटा 4.3 % असून मागील दोन दशकापासून सेवा निर्यातीत वेगाने वाढ झाली आहे. जागतिक सेवा निर्यातीत भारताचा वाटा 2005 मध्ये 1.9 % होता, 2014 मध्ये 3 % आणि 2025 मध्ये 4.3 % पर्यंत वाढला आहे.

माहिती तंत्रज्ञान, वाहतूक , सॉफ्टवेअर , विमा, दळवळण इत्यादि सेवांची निर्यात 2020-21 मध्ये 206 अमेरिकन डॉलर्स एवढी होती. ती 2021-22 मध्ये 250 अमेरिकन डॉलर्स पर्यन्त पोहोचली होती . त्यात आयटी-बीपीम ही भारतातील सर्वात मोठी निर्यात सेवा होती. ( एकूण सेवा निर्यातीच्या 49 %) याच कालावधीत व्यवसाय सेवा, वाहतूक सेवा, प्रवास सेवा आणि वित्तीय सेवांचा वाटा अनुक्रमे 23 %, 12 %, 3 % आणि 2 % एवढा होता. भारत जगातील अनेक देशांमध्ये सेवा निर्यात करतो त्यात अमेरिका, ब्रिटन आणि जपान हे भारताचे सेवा आयतक देश आहेत. याशिवाय कॅनडा , आशिया , ऑस्ट्रेलिया , न्यूझीलंड या देशांचाही समावेश त्यात होतो. कामगार उपलब्धता, स्वस्त कामगार आणि इंग्रजी भाषेचे कौशल्ये यामुळे भारतातील सेवा जगभरात लोकप्रिय आहेत. 2020-21 दरम्यान अमेरिका आणि कॅनडाने भारतातून 75-अब्ज अमेरिकन डॉलर्स सेवा आयात केल्या. यात युरोप आणि आशियचा एकत्रित वाटा 37 % एवढा होता. तर , ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड एकत्रित वाटा 3 % एवढा होता. इतर निर्यातक देशांमध्ये हाँगकाँग सिंगापूर, जर्मनी , बांग्लादेश, नेदरलँड व नेपाळ या देशांचा समावेश आहे..

**5) पायाभूत सुविधांची निर्मिती ( Infrastructure formation)**

देशात रोजगार निर्मिती करणे, लोकांचे जीवनमान उंचावणे तसेच आर्थिक विकासाला चालना देणे इ. दृष्टीने पायाभूत सुविधांचे योगदान अत्यंत महत्वाचे असते. बँका व वित्तसंस्था, वाहतूक व दळणवळण, दूरसंचार, विमा, हॉटेल व पर्यटन, साठवणूक व व्यापार सेवा, बांधकाम, रियल ईस्टेट, संगणक हार्डवेअर व सॉफ्टवेअर, इंटरनेट, पर्यटन, संरक्षण , प्रशासन शिक्षण, आरोग्य , पाणीपुरवठा, गृहनिर्माण , स्वच्छता अशा सर्व आर्थिक व सामाजिक वरकड सोयी देशातील शेती व उद्योग क्षेत्राच्या विकासाला प्रेरणा देणाऱ्या असतात. भारताच्या आर्थिक विकासाचा वेग वाढण्यासाठी या सर्व सेवांचे मोलाचे योगदान आहे. भारतात पायाभूत सुविधांची निर्मिती व देखभाल सामान्यतः सार्वजनिक क्षेत्रामार्फत केली जाते.

**सारांश ( Summary) :**

भारताच्या अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे योगदान दिवसेंदिवस वाढतच आहे. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा वाटा उल्लेखनीय असून भारताच्या निर्यातीतही सेवा क्षेत्र महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. माहिती तंत्रज्ञान, बँका व विमा, वाहतूक , दूरसंचार व मनोरंजन, स्थावर मालमत्ता, व्यापारसेवा इत्यादि माध्यमातून भारतातील सेवा क्षेत्राने देशाच्या जलद विकासाला चालना दिलेली आहे. मागील दोन दशकात जागतिक सेवा निर्यातीत भारताचा वाटा दुप्पट झाला आहे. भारताच्या एकूण सेवा निर्यातीत संगणक सेवा ( सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर) वाटा सर्वाधिक असला तरी आरोग्य , शिक्षण, बँका आणि विमा, पर्यटन, स्वच्छता अशा अनेक सेवांमध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. भारताच्या विकसित भारत 2047 साठी येणाऱ्या काळातही सेवा क्षेत्राचे मोलाचे योगदान असणार आहे, यात शंका नाही.

**संदर्भ ग्रंथ ( References) :**


1) के. एम. भोसले, के. बी. काटे – भारतीय अर्थव्यवस्था – फडके प्रकाशन कोल्हापूर 416012, मे 2012

2) एस. के. मिश्रा, व्हि. के. पुरी- भारतीय अर्थव्यवस्था- हिमालय पब्लिशिंग हाऊस मुंबई 400004 पृष्ठ क्र. 447-462, 2011

3) डॉ किरण देसले – दीपस्तंभ स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र भाग 1- दीपस्तंभ प्रकाशन, जळगांव, 2023

4) एल. एन. चव्हाण – भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास- भाग-1 प्रशांत पब्लिकेशन जळगांव, 425001, जून 2003

5) योजना मासिक, सप्टेंबर 2011

6) आर्थिक सर्वेक्षण 2024-25, भारत सरकारचे वित्त मंत्रालय आर्थिक व्यवहार विभाग आर्थिक विभाग नॉर्थ ब्लॉक नवी दिल्ली-110001 जानेवारी, 2025, पृष्ठ क्र. 219-243

7) नीती आयोग. (२०२५). भारताचे सेवा क्षेत्र: GVA ट्रेंड आणि राज्य-स्तरीय गतिशीलता पासून अंतर्दृष्टी. ऑक्टोबर 2025.

8) Latha C. M., Dr. V. Shanmugam "Growth of Service Sector in India" IOSR Journal Of Humanities And Social Science (IOSR-JHSS) Volume 19, Issue 1, Ver. IV (Jan. 2014), PP 08-12

9) https://www.pib.gov.in

10) https://www.indiabudget.gov.in/economicsurvey

11) https://www.loksatta.com/career/upsc-mpsc-indian-economy